## नि.क्र. २९८ वर आदेश
## (दिनांक १५.१२.२०२०)

धनको यांनी सदरच्या प्रकरणात दस्ताऐवज दाखल करण्याची परवानगी मागितली आहे. धनकोच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, धनको याला सदरच्या प्रकरणासंबंधी महत्त्वाचा दस्ताऐवज दाखल करायचे आहे. पुढे त्यांनी अशी विनंती केली की, त्यांचा अर्ज मंजूर करण्यात यावा.

२. ऋणको क्रं. २/२ व ३ च्या वकिलांनी सदरच्या अर्जावर त्यांचा आक्षेप आहे असे उत्तर सादर केले आहे.

३. सदरचे प्रकरण हे युक्तीवादाकरीता प्रलंबित आहे. त्यामुळे धनकोने सादर केलेले दस्ताऐवज हे अभिलेखावर घेतल्यास ऋणको यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. करिता, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

अर्ज मंजूर करण्यात येतो.
(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

स्वाक्षरीत/–
(अ.रा. सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
अहमदपूर.

अहमदपूर
दिनांकः– १५.१२.२०२०